# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.01.2026** **वार-सोमवार**

---

**सायकल**

पिंपरी-चिंचवड महापालिकेनं 'पुणे ग्रँड टूर २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी ५२ किलोमीटर लांबीचा सायकल मार्ग पूर्ण केला आहे. यावेळी अनेक मार्गांवरील पदपथांची दुरुस्ती करण्यात आली तसंच गतिरोधक काढून टाकण्यात आले. कुशल अभियंता आणि कंत्राटदार यांच्या सहकार्यामुळं हे काम वेगानं करणं शक्य झाल्याचं मत महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केलं.

**मधमाशा**

पुण्यातील गिरीप्रेमी संस्थेच्या वतीनं १०-१५ वर्षे वयोगटातील ३१ मुला-मुलींसाठी आयोजित मधे-घाट ते कर्णवाडी गिर्यारोहण उपक्रमाच्या दरम्यान त्यांच्यावर अचानक मधमाशांनी हल्ला केला. या घटनेची माहिती मिळताच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अंबादास देवकर यांनी तातडीनं १०८ आणि १०२ क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिकांना पाचारण केले.

जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिका यांनी तातडीनं समन्वय साधत आवश्यक कार्यवाही सुरू केली. रुग्णवाहिकांच्या माध्यमातून सर्व बाधितांना वेल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मधमाशांच्या चाव्यांमुळं मळमळ, उलटी, चक्कर येणं, चेहरा, डोळे

आणि ओठांवर सूज, तीव्र वेदना अशी लक्षणं दिसून आल्यानं सर्वांवर तातडीनं प्राथमिक उपचार करण्यात आले. सध्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून कोणाच्याही जीवितास धोका नाही. जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणेनं दाखवलेल्या या कार्यतत्परतेबद्दल मुख्य  कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सर्वांचं कौतुक केलं.

**<u>स्वीप</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत महापालिकेच्या वतीनं आज दिव्यांग बांधवांच्या सहभागातून मतदान जनजागृती फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>पाटील</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीनं पुणे शहर प्रभारी अध्यक्षपदी माजी नगरसेवक श्रीकांत पाटील यांची तर पुणे शहर निवडणूक समन्वयकपदी स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी ही निवड केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानं शहराध्यक्षपदी श्रीकांत पाटील यांची वर्णी लागली आहे.

**<u>राजीनामा</u>**

महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या माजी उपाध्यक्ष संगीता तिवारी यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबतचं पत्र त्यांनी प्रदेशाध्यक्ष  हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे पाठवलं आहे.

**कीर्तन**

दहावे शीख गुरु आणि खालसा पंथाचे संस्थापक श्री गुरुगोविंद सिंगजी यांच्या 358 व्या प्रकाश पर्व अर्थात जन्मदिनानिमित्त काल पुण्यात नगर कीर्तनाचं आयोजन करण्यात आलं होतं. हे नगर कीर्तन गुरुद्वारा गुरुनानक दरबार यांच्या वतीनं आयोजित करण्यात आलं. याप्रसंगी गुरु नानक प्रशाला आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेरी काढली. यामध्ये गुरुगोविंद सिंग जी यांचे विचार, जीवनकार्य आणि बलिदानाची माहिती देणारे सजवलेले रथही होते.

**पुरस्कार**

सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणाऱ्या माई परिवारातर्फे त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त काल पुण्यात यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार, एकलव्य बाल शिक्षण आणि आरोग्य न्यासच्या अध्यक्ष रेणूताई गावस्कर यांना तर बुलढण्यातील सेवा संकल्प प्रतिष्ठान या संस्थेला प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. “सिंधुताई सपकाळ या कारुण्याचा झरा होत्या, सेवेतून त्यांनी आपलं कार्य केलं आणि ते करत असताना त्यांनी इतरांच्या कार्यालाही मदत केली, सिंधुताईंचं कार्य वटवृक्षासारखं आहे” , अशी भावना प्रभुणे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. यावेळी माईंच्या खडतर प्रवासाची गोष्ट उलगडून सांगणाऱ्या –‘चिंधीची गोष्ट’ - या माई पब्लिकेशन्सनं तयार केलेल्या बालकथासंग्रहाचं प्रकाशन करण्यात आलं.

**रेल्वे**

पुणे रेल्वे विभागातील दौंड-काष्टी या मार्गावर तांत्रिक कामांसाठी १५ ते २५ जानेवारीदरम्यान विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. तर पुणे-सोलापूर एक्स्प्रेस, इंटरसिटी, पुणे सोलापूर डीईएमयू, पुणे दौंड डीईएमयू यांसह काही स्थानिक आणि लांब पल्ल्याच्या गाड्या धावणार नाहीत.

**कारवाई**

पुणे शहरातील वाहतूक शिस्त अबाधित राखण्याच्या उद्देशानं आणि  नागरिकांच्या प्राणसुरक्षेस प्राधान्य देण्यासाठी पुणे शहर वाहतूक विभागाकडून 02 जानेवारी ते 04 जानेवारी  दरम्यान मद्यपान करून वाहन चालवणारे चालक आणि ट्रिपल सीट वाहनचालक वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष कारवाई करण्यात आली. मद्य पिऊन वाहन चालवणाऱ्या एकूण 232 वाहनचालकांवर आणि ट्रिपल सीट असलेल्या 720 दुचाकी वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यापैकी 121 मोटारसायकल वाहने जप्त करण्यात आली आहेत.

**शेख**

'टाइम्स ऑफ इंडिया' चे पुण्यातील ज्येष्ठ वार्ताहर असीम शेख यांचं आज सकाळी पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. ते 52 वर्षांचे होते. सॅलिस्बरी पार्क इथं एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या चार महिन्यांपासून ते आजारी होते. गुन्हे पत्रकारितेत असीम शेख यांनी एकंदर 25  वर्षे मोलाचं योगदान दिलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**